ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 11 | ISSUE - 8 | APRIL - 2025

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# सोलापूरचे असहकार चळवळीतील योगदान



**प्रा. डॉ. किशोर नागनाथ जोगदंड**
**इतिहास विभाग प्रमुख**
**वसुंधरा कला महाविद्यालय, जुळे सोलापूर**

## प्रस्तावना

जानेवारी 1915 साली महात्मा गांधीजी भारतात आले. त्यावेळी ते 45 वर्षाचे होते. आपल्या सत्याग्रहाच्या शस्त्राने दक्षिण आफ्रिकेत यश संपादन करून हिंदुस्तानात आलेले महात्मा गांधी एक यशस्वी पुढारी होतेसत्याग्रहाबद्दल लोकमान्य टिळक म्हणतात की, महात्मा गांधीचा सत्याग्रहाचा मार्ग हा राज्यकर्त्यांच्या दृष्टीने एक प्रकारे शास्त्रपूत झालेला होता[1]अशा प्रकारे म. गांधी व त्यांचासत्याग्रहमार्ग याच्याकडे हिंदुस्थानातील मोठमोठे पुढारी आदराने पहात होतेम. गांधींनी इ. स. १९१५ पासून इ. स. १९२० सालापर्यंतच्या काळात जी भाषणे व ज्या चळवळी केल्या, त्यामुळे सामान्य जनतेचे लक्ष त्यांनी आपणांकडे आकर्षित करून घेतले होते

म. गांधींच्या ज्या एका भाषणाने हिंदुस्थानातील सामान्य जनतेचे लक्ष विलक्षण रीतीने त्यांच्याकडे वेधून घेतलेते भाषण म्हणजे इ. स. १९१६ च्या फेब्रुवारीत बनारस येथील हिंदू विश्वविद्यालयाच्या उद्घाटनसमारंभाच्या प्रसंगी केलेले भाषण होय या उद्घाटनसमारंभास हिंदुस्थानातील सर्व प्रसिद्ध पुढारी आणि राजे-महाराजे यांना पं मालवीय यांनी निमंत्रण दिलेले होते या समारंभाच्या स्वरूपास साजेल अशा प्रकारे तेथे जमलेल्या मोठमोठ्या लोकांची भाषणे करण्याचे एक मोठे ज्ञानसत्र सुरू होते लॉर्ड हार्डिंज यांने समारंभास भेट दिली होती. हिंदुस्थानातील उत्साही शेकडो विद्यार्थी या ज्ञानसत्रात कर्तव्याचे धडे घेत होते. ४ फेब्रुवारी रोजी शेकडो विद्यार्थी, अनेक राजे-रजवाडे, राष्ट्रीय पुढारी यांच्यासमोर म गांधींचे हे सुप्रसिद्ध भाषण झाले यावेळी ते म्हणाले की, "राष्ट्रसभेने स्वराज्याचा ठराव केलेला आहे. आणि ऑल इंडिया काँग्रेस कमिटी व मुस्लिम लीग या संस्था लवकरच एखादा कार्यक्रम लोकांपुढे ठेवतील,याबद्दल मला शंका नाही. पण माझ्याविषयी बोलावयाचे तर मी स्पष्टपणे तुम्हांस सांगू शकतो,की हे पुढारी काय करतील, इकडे माझे फारसे लक्ष नसून देशातील विद्यार्थी आणि देशातील सामान्य जनता काय करणार आहेत, इकडे माझे लक्ष आहे.[2]यावरून आपणास हिंदुस्थानातील जनतेचा पाठिंबा आणि विश्वास महात्मा गांधींना मोठ्या प्रमाणावर एकाएकी कसा मिळाला याचे उत्तर मिळेल. 1920 पर्यंत गांधीजींनी शेतकरी, कामगार, तरुण वर्ग यांना सोबत घेऊन लढे यशस्वी करून दाखवले होते. उदाहरणार्थ चंपारण्य सत्याग्रहाच्या माध्यमातून शेतकऱ्यांचा प्रश्न हाती घेतला. आमदाबादच्या गिरणी कामगारांचा संप यशस्वी केला. रोलेक्ट कायद्याला तरुणांनी कडाडून विरोध केला होता. या जुलमी कायद्याच्या विरोधात गांधीजी उभा राहिले. त्यामुळे संपूर्ण देशाचे लक्ष गांधीजींच्या नेतृत्वाकडे आकर्षित झाले त्यांनी सुरू केलेले आंदोलने हे सर्वांना स्वातंत्र्य लढ्यात सहभागी होता येईल अशा स्वरूपाचे होते

## असहकार आंदोलन

1 ऑगस्ट 1920 रोजी असहकार आंदोलनास औपचारिक सुरुवात झाली.22 जून 1920 रोजी व्हाईसरॉयला लिहिलेल्या एका पत्रात गांधीजींनी आंदोलनाचा इशारा दिला होता "चुकीच्या मार्गाने राज्यकारभार करणाऱ्या राज्यकर्त्याशी असहकार्य करण्यास नकार देण्याचा प्रजाजनांचा हक्क पूर्वापार परंपरेने चालत आलेला आहे"[3]असे त्यांनी या पत्रात ठणकावले होते एक ऑगस्ट च्या पहाटेच लोकमान्य टिळक कालवश झाले होते. त्यांच्या मृत्यूचा दुखवटा व आंदोलनाची सुरुवात एकाच दिवशी आल्याने देशभरातील जनतेने

हरताळ पाळून मिरवणुका काढल्या. अनेकांनी उपवास करून प्रार्थना म्हटल्या. एक ऑगस्ट 1920 रोजी सुरू केलेल्या असहकार आंदोलनास कलकत्त्याच्या अधिवेशनात राष्ट्रसभेची संमती मिळवून घेतली. हे अधिवेशन सप्टेंबर मध्ये लाला लजपतराय यांच्या अध्यक्षतेखाली झाले. या अधिवेशनात राष्ट्रीय सभेने असहकाराचा कार्यक्रम जाहीर केला. या कार्यक्रमांतर्गत सन्मार्गदर्शक पदव्या व अधिकाराचा त्याग, सरकारी दरबार, उत्सव वगैरे समारंभाशी असहकार, सरकारी व निमसरकारी शाळातून मुलांना काढून त्यांच्या शिक्षणासाठी राष्ट्रीय शिक्षण संस्थाची स्थापना,वकील व अशिल, ब्रिटिश न्यायासनावर बहिष्कार घालून खाजगी पंचायती स्थापन करणे, लष्करी व मुलकी नोकरीवर बहिष्कार, कायदेमंडळ व मतदानावर बहिष्कार, परकीय मालावर बहिष्कार इत्यादीचा समावेश करण्यात आला. या कार्यक्रमाचा संपूर्ण देशाने अंगीकार केला. असहकार चळवळीमध्ये भारतातील विविध भागात ब्रिटिश सरकारच्या विरोधात सर्वसामान्य जनता सहभागी झाली. आंदोलन सक्रिय झाले. या आंदोलनाचे पडसाद सोलापूर शहरांमध्ये ही पडले. सोलापूर शहरातील सर्वसामान्य जनतेने असहकार चळवळीमध्ये दिलेले योगदान खालीलप्रकारे स्पष्ट करता येईल.

## गांधीजी आणि सोलापूर

सोलापूर मध्ये स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात अनेक राष्ट्रीय नेत्यांनी भेटी देवून सभा घेतल्या होत्या. इ. स. १९२० मध्ये लो. टिळक यांच्या नेतृत्वाखाली सोलापूरमध्ये मुंबई राज्य राजकीय परिषद भरली होती या परिषदेचे अध्यक्ष तात्यासाहेब केळकर होते.[4]अशा प्रकारे स्वातंत्र्य लढ्यातील महत्त्वपूर्ण केंद्र म्हणून सोलापूरची ओळख निर्माण होत होती. अशात इ. स. 1920 मध्ये महात्मा गांधीजींनी असहकार चळवळीचा कार्यक्रम जाहीर केला. या चळवळीच्या काळात महात्मा गांधीचा मे, 1921 रोजी सोलापूर जिल्ह्याचा दौरा केला होता. यावेळी जिल्ह्यात त्यांच्या चार सभा झाल्या. बार्शी, कुर्डूवाडी, पंढरपूर आणि सोलापूर येथील झालेल्या सभेत गांधीजींनी आपल्या भाषणातून स्वदेशी चळवळीचा, स्वदेशी तत्त्वाचा हेतू समजावून सांगितला.[5] 26 मे 1921 रोजी गांधीजीचे सोलापूरला आगमन झाले. त्यावेळी त्यांना नगराध्यक्ष पी. ए. नगरवाला यांच्या हस्ते मानपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष हिराचंद नेमचंद दोशी हे होते. गांधीजींना वीस हजार रुपयांचा निधी लोकमान्य टिळक स्मारकासाठी स्वराज्य फंडाला दिला.[6]दुसऱ्यांदा19 व 21 फेब्रुवारी 1927 साली म. गांधीजी आणि कस्तुरबा गांधी सोलापूरला आले होते. त्यांचा मोतीबाग गेस्ट हाऊस मध्ये तीन दिवस मुक्काम होता. यावेळी त्यांनी सोलापूर, करमाळा, कुर्डूवाडी, बार्शी, पंढरपूर आणि वळसंग इत्यादी ठिकाणी सभा घेतल्या होत्या. यावरून आपणास असे लक्षात येते की, सोलापूर जिल्ह्यात महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाचा आणि विचाराचा प्रभाव पडलेला होता. परिणामी गांधीवादी विचाराच्या अनेक युवक तयार झाले. पुढे त्यांनी स्वातंत्र्य लढ्यात भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व केले.

## सोलापुरातील जनतेचे असहकार चळवळीतील योगदान

असहकार चळवळीमध्ये सोलापुरातील सर्वसामान्य माणसांनी सक्रिय सहभाग घेतला होता. विशेषत: सोलापुरातील कामगार वर्गाने स्वातंत्र्यलढ्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. ब्रिटिश साम्राज्यवादाच्या विरोधात त्यांनी संपाचे हत्यार वापरले. ब्रिटिशांच्या अन्याय धोरणाला विरोध करण्यासाठी 26 जानेवारी 1920 रोजी संप पुकारला होता. यावेळी देशातील 15 लाख कामगार संपावर होते. सोलापुरातील हा संप भीमरावाचा संप म्हणून ओळखला जातो.[7]कारण त्याचे नेतृत्व कामगार नेता भीमराव यांनी केले होते म्हणून त्याला भिमारावाचा संप असे म्हणतात. याशिवाय वलय्या आडम, चांद अप्पाभाई, विठ्ठल अप्पा कवडे,माणिक शेठ यांचाही सहभाग होता. संप दडपून टाकण्यासाठी लष्कर आणण्यात आले होते. लष्कराने गोळीबार केला त्यात ९ कामगार मरण पावले तर काही जखमी झाले.[8]अशा घटनांमुळे कामगार वर्गामध्ये राजकीय जागृती वाढत गेली.पुढे झालेल्या राजकीय चळवळीत कामगार आणि कामगार नेते स्वातंत्र्य लढ्यात आघाडीवर होते. असहकार चळवळीमध्ये सोलापुरातील चक्रपाणी काकडे, कवी कुंजबिहारी, व्य. गो. अंदुरकर आणि देवस्थळी या तरुणांनी सहभाग घेतला होता, त्याबद्दल त्यांना शिक्षाही झाल्या होत्या. १९२१ मध्ये स्वामी रामानंद तीर्थ, डॉ. कृ. भी. अंत्रोळीकर इ. राष्ट्रीय शाळा सुरु केल्या. पंढरपूर येथेही राष्ट्रीय शाळा सुरु केली होती.[9]नोव्हेंबर १९२१ इंग्लंडच्या बादशहाची भारताला भेट होणार होती त्याच्या निषेधाचे पत्रक गणपतराव बिडकर (पंढरपूर) यांनी काढले. त्यामुळे त्यांना अटक झाली. विजयवाडा कॉंग्रेसच्या (१९२१) आदेशानुसार कुर्डूवाडी येथे मार्च १९२१ला बैठक होऊन सत्याग्रही पाठविण्याचे ठरले. या बैठकीस वामनराव सडेकर, माणिकचंद दलचंद उपस्थित होते. यावेळी राष्ट्रीय आघाडीची स्थापना करण्यात आली.[10]

## जगन्नाथ मोरेश्वर सामंत आणि असहकार चळवळ

जगन्नाथ मोरेश्वर सामंत हे व्यवसायाने नामांकित वकील होतेइ.स. 1895 सोलापुरात त्यांनी वकिली व्यवसाय सुरू केला राष्ट्रीय आंदोलनामध्ये नेतृत्व करणारे बहुतेक वकिली व्यवसाय करणारे होते त्याचा प्रभाव म्हणून जगन्नाथ मोरेश्वर सामंत हे सुद्धा राष्ट्रीय लढ्यामध्ये सहभागी झाले. त्यांच्यावर लोकमान्य टिळक आणि महात्मा गांधीजींच्या विचारांचा प्रभाव होता. त्यामुळे ते स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झाले. असहकार चळवळ सुरू झाली होती त्यावेळी महात्मा गांधींनी देशव्याशी यांना असहकार चळवळीमध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले होते तेव्हा त्यांनी गांधीजीच्या आव्हानाला प्रतिसाद देऊन अखिल व्यवसाय सोडून सहकाराच्या चळवळीत सक्रिय सहभाग घेतला.[11] असहकार चळवळीमध्ये स्वदेशीचा, राष्ट्रीय शिक्षणाचा पुरस्कार व प्रचार आणि परदेशी मालावर बहिष्कार असे उपक्रम हाती घेण्यात आले होते. हे उपक्रम राबवण्यात सामंत वकील आघाडीवर होते इ. स. 1920 साली झालेल्या काँग्रेसच्या प्रांतिक परिषदेचे स्वागत अध्यक्ष सामंत वकील होते. ते जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष असल्यामुळे त्यांच्या नेतृत्वाखाली अनेकांनी असहकार चळवळीत भाग घेतला होता.[12]सोलापुरातील तरुण वर्ग हा टिळक युगाचा विस्तार व अखेर आणि गांधीयुगाचा आरंभ यात सामावलेली होतीयामध्ये सुरुवातीच्या काळात जगन्नाथ मोरेश्वर सामंत, डॉ. वा. का. किर्लोस्कर, शिवबाळप्पा अण्णाराव देशमुख, रा. ग. खडकीकर इत्यादी तरुणांचा उल्लेख करता येईल. त्यांनी नगरपालिका आणि समाजकारण इत्यादीच्या कार्यावर भर दिला होता. पुणे, मुंबई, नाशिक येथील घटना प्रमाणे असहकार चळवळीत दरम्यान मोठ्या घटना घडलेल्या नव्हत्या. संप व हरताळ होत असत. राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या भेटी आणि व्याख्याने आयोजित केली जात असत.[13]अशा माध्यमातून असहकार चळवळीमध्ये सक्रिय सहभाग घेऊन जे स्वातंत्र्यासाठी करता येईल ते सोलापुरातील जनसामान्य लोकांनी केले त्यामुळे राष्ट्रीय चळवळीत सोलापूरकरांनी 1870 ते 1925 या कालखंडातील स्थित्यंतराचा उत्कर्ष बिंदू म्हणजे सोलापुरातील मार्शल लॉ ही घटना होय.

## परशराम सिताराम राठी

सोलापूर जिल्ह्यात म. गांधीचे शिष्य म्हणून परशराम सिताराम राठी यांना ओळखले जात होते.[14]परशुराम राठी मूळचे सातारा जिल्ह्यातील औंध संस्थानातील होते कोरेगावात त्यांचे कापडाचे दुकान होते सोलापूर येथे कापड गिरणी असल्यामुळे ते सोलापूर येथे आले आणि त्यांनी कापडाचे दुकान सोलापुरातील फलटण गल्लीत सुरू केले व्यापार करत- करत स्वातंत्र्य सेनानी रामकृष्ण जाजू यांच्याशी त्यांचा स्नेह निर्माण झाला. सोलापुरात महात्मा गांधी इस. 1921 मध्ये सभा झाली. या सभेतील गांधीजींच्या भाषणांने ते प्रभावित झाले परिणामी व्यापारातील लक्ष काढून स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झाले खादीचा, स्वदेशी वस्तूचा प्रसार, दारूबंदी आणि गांधी तत्त्वज्ञानाचा प्रसार इत्यादी असहकार चळवळीशी पूरक कार्यक्रम त्यांनी राबवला. त्याचबरोबर असहकार चळवळीचा भाग म्हणून सोलापूरचे सार्वजनिक काका बाबुराव जक्कल यांनी कॉलेजवर बहिष्कार घातला होता.[15]

## न्यायालयावर बहिष्कार असहकार चळवळीचा कार्यक्रम आणि सोलापुरातील प्रतिसाद

असहकार चळवळीच्या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून वकिलांनी आपला व्यवसाय सोडून द्यावा असे ठरले होते यानुसार काही वकिलांनी व्यवसाय कायमचा सोडून दिला तर काही वकिलांनी वर्षभर वकील सोडली तर काही जणांनी खटले चालविण्याचे नवीन काम हाती घेण्यास नकार दिला. यात नामांकित वकिलामध्ये अण्णासाहेब बोपटकर व बॅरिस्टर जयकर यांचा समावेश होता. या घटनेचे पडसाद सोलापूर मध्ये सुद्धा पडले. सोलापुरात वकिली व्यवसाय सोडून सर्व वेळ देश कार्यासाठी खर्च घालणारा युवक म्हणजे रामचंद्र शंकर राजवाडे होय.[16] काँग्रेसच्या आदेशानुसार लोकांचे खटले न्यायालयाऐवजी'लवादा'तर्फे चालविण्याचा निर्णय झाला, त्यासाठी गणेशराय मुरलीधर, जगन्नाथ सामंत, गोपाल गाडगीळ, गुजर यांचे लवाद मंडळ स्थापण्यात आले अशी लवाद मंडळे पंढरपूर, बार्शी, मोहोळ येथे स्थापन केली गेली.[17]

## सारांश

समग्र भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासामध्ये देशातील प्रत्येक भागाचे व सर्वसामान्य जनतेचे महत्त्वपूर्ण योगदान राहिलेले आहे. त्याच प्रकारे सोलापूरने सुद्धा भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीत राष्ट्रीय स्तरावर घडणाऱ्या प्रत्येक चळवळीला सक्रियपणे राबवण्यात सोलापुरातील जनतेने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला त्याची अंमलबजावणी केली. विशेषतः स्वातंत्र्याच्या चळवळीचे दोन महत्त्वपूर्ण कालखंड करतात. त्यामध्ये 1885 ते 1920 आणि 1920 ते 1947 या दोन्ही कालखंडात सोलापूरने त्या-त्या स्तरावर योगदान दिलेले आहे. 1920 ते

1947 या कालखंडात गांधीवादी चळवळीचा प्रभाव सोलापूर वर पडलेला होता त्यातून सोलापूरत गांधीवादी नेत्यांची एक फळी तयार झाली. उदा. **जगन्नाथ मोरेश्वर सामंत, परशराम सिताराम राठी, डॉ. कृ. भी. अंत्रोळीकर, डॉ. वा. का. किर्लोस्कर, शिवबाळप्पा अण्णाराव देशमुख, रा. ग. खडकीकर, रामकृष्ण जाजू, चक्रपाणी काकडे, कवी कुंजबिहारी, व्य. गो. अंदुरकर, तुळसीदास जाधव** इ. नेत्यांचा उल्लेख करता येईल. त्यामध्ये सोलापूर ढवळून निघाले आणि महात्मा गांधीजींनी सुरू केलेल्या असहकार चळवळीत, सविनय कायदेभंगाच्या आंदोलनात आणि चलेजाव चळवळ इत्यादी स्वातंत्र्य चळवळीच्या टप्प्यात सोलापूरने आपला वेगळा ठसा उमटवलेला आहे. आजपर्यंत सोलापुरातील असहकार चळवळीच्या इतिहासावर फारसा इतिहास अधोरेखित झालेला नव्हता, तो इतिहास प्रकाशात आणण्याचा या शोधनिबंधांच्याद्वारे प्रयत्न करण्यात आलेला आहे

## संदर्भ टिपा


1. जावडेकर शं.द., आधुनिक भारत, सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला प्रकाशन, पुणे, तिसरी आवृत्ती 1890, पृष्ठ क्रमांक 361.
2. कित्ता पृ. क्र. 363
3. चंद्र बिपन, इंडियाज स्ट्रगल फॉर इंडिपेंडेन्स (अनु, काळे एम. व्ही.) के सागर प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती, एप्रिल 2003, पृष्ठ क्रमांक 216
4. भाई छन्नुसिह चंदेले स्मृतिग्रंथ, प्रकाशक व्ही. आर. कुलकर्णी, १९८६, पृ. क्र. 24
5. येळेगावकर श्रीकांत, भारतीय स्वातंत्र्य लढ्यात सोलापूरचे योगदान, जटायु प्रकाशन, सुधारित तिसरी आवृत्ती, ऑगस्ट 2022, पृष्ठ क्रमांक 243
6. फडके य. दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड तिसरा, श्री विद्या प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती, आक्टोबर 1999, पृष्ठ क्रमांक, 45
7. साने मीनाक्षी, सोलापूरचा कामगार, लालबावटा गिरणी कामगार युनियन प्रकाशन, सोलापूर, पहिली आवृत्ती 22 मे 19 34, पृष्ठ क्रमांक 5, आजही अनेक ग्रंथामध्ये भीमरावाचा संप म्हणूनच त्याचा उल्लेख आलेला आहे त्याच्या संपूर्ण नावाचा उल्लेख आढळत नाही
8. बुवा पु. ज., संपा. स्मरणिका, समर्पण, प्रकाशन व वर्ष उपलब्ध नाही, पृष्ठ क्रमांक, १६
9. कुलकर्णी व्ही. आर., शतकान्वय, अमृतमहोत्सव गौरव समिती प्रकाशन, ऑक्टोबर २००१, पृ. क्र. १४.
10. कुलकर्णी व्ही. आर., शतकान्वय, अमृतमहोत्सव गौरव समिती प्रकाशन, ऑक्टोबर २००१, पृ. क्र. १५.
11. येडेगावकर श्रीकांत, भारतीय स्वातंत्र्य लढ्यात सोलापूरचे योगदान, जटायू प्रकाशन, सुधारित तिसरी आवृत्ती, 2022 पृ. क्र. 49
12. बुवा पु. ज., संपा. स्मरणिका, समर्पण, प्रकाशन व वर्ष उपलब्ध नाही, पृष्ठ क्रमांक, २७
13. बुवा पु. ज., संपा. स्मरणिका, समर्पण, प्रकाशन व वर्ष उपलब्ध नाही, पृष्ठ क्रमांक, ३४
14. अंदूरकर व्यं गो., सोलापूरची स्वातंत्र्य देवता, रविंद्र प्रकाशन, सोलापूर, १९७५, पृ. क्र. ५७.
15. येळेगावकर श्रीकांत, भारतीय स्वातंत्र्य लढ्यात सोलापूरचे योगदान, जटायु प्रकाशन, सुधारित तिसरी आवृत्ती, ऑगस्ट 2022, पृष्ठ क्रमांक, 210
16. फडके य. दि. विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड तिसरा, श्री विद्या प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती, ऑक्टोबर 199, पृष्ठ क्रमांक, 38
17. कुलकर्णी व्ही. आर., शतकान्वय, अमृतमहोत्सव गौरव समिती प्रकाशन, ऑक्टोबर २००१, पृ. क्र. १४.